**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५२१/ पुणे | श्री.सचिन नवघणे तर्फे ॲड. श्री. जयराज रामचंद्र विजापुरे व ॲड.मंगला लक्ष्मण शिंदे ए-११, महिन्म सोसायटी, भाग्यश्री बिल्डिंग, कर्वेनगर, पुणे-५२ | सहाय्यक कर आकारणी व कर संकलक, पुणे महानगर-पालिका, पुणे | कर आकारणी व कर संकलन प्रमुख, पुणे महानगर-पालिका, पुणे | अपीलकर्त्याची मिळकत क्र.५३९/४, न्यू टिंबर मार्केट, महात्मा फुले पेठ, पुणे चा घोषित झोपडपट्टी टॅक्स घेता येतो का ? स्लम घोषित करण्याबाबतच्या परिपत्रकाची प्रत व सदर कर आकारणी कोणत्या कायद्याने करता येते, याबाबत माहिती | आवश्यक माहिती अपीलकर्त्यास १५ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २७.५.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १००५ /पुणे | श्रीमती पुष्पा अशोक अहिरे १६३, सोमवार पेठ, नागेश्वर मंदिरासमोर, पुणे-११ | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुणे | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर, पुणे | दस्त क्र.६१७५/८३ हा दस्त मिळणेबाबत | आवश्यक त्या माहितीने समाधान झाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. १९.५.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३०१८ / पुणे | श्री. विश्वनाथ दत्तात्रय फडके रा.कानगांव, ता. दौंड, जि. पुणे | गाव कामगार तलाठी कानगाव, ता.दौंड, जि.पुणे | मंडल अधिकारी, पाटस, ता. दौंड, जि.पुणे | कानगांव गट नं.७८० नवीन ७८४ स्थळ पाहाणी नकाशाबाबत, सन २००५-२००६ वर्षांची पीक पाहणी दि. २.१२.२००५ रोजी केली. त्यानुसार स्वतंत्र वहिवाटी कोणाचे शेजारी कोणाची आहे, याचा नकाशा तयार केला आहे त्याची प्रत, स्थळपाहणी नकाशाची प्रमाणित प्रत व इतर अनुषंगिक माहिती | अपीलकर्त्याने मूळ माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ ( अपील क्र. १५२१ /पुणे, १००५/पुणे, व ३०१८/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १५२१/पुणे व ३०१८/पुणे मध्ये निष्कर्षात नमूद केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार कार्यवाही केली नसल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे

दि. ३० .७.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८६३/ पुणे | श्री.शरद लक्ष्मण गोरवाडकर ११३/डी , प्रतापनगर, रेल्वे कॉलनी, वडोदरा | निवासी नायब तहसीलदार, ता.हवेली , जि. पुणे | तहसीलदार, ता.हवेली , जि. पुणे | धनकवडी सिटी सर्वे नं.२७/१ वरील बांधकामाबाबत व संबंधीत अभिलेखांबाबत | अपीलकर्त्याने अनेक माहिती-अर्जांच्या संदर्भात आयोगाकडे एकच अपील केले आहे. प्रत्येक माहिती अर्जाकरिता आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. |
| २ | २३१३ +२५८९ /पुणे | श्री.दिपक अंकुश गायकवाड मु.पो.पणदरे, ता.बारामती, जि.पुणे | ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत पणदरे , ता.बारामती, जि.पुणे | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती बारामती, जि.पुणे | श्री.धर्मसिंग अंकुश गायकवाड व सौ. जयश्री धर्मसिंग गायकवाड यांना इंदिरा आवास योजनेंतर्गत बांधून दिलेले घरकुल वडिलोपार्जित आहे का, मिळकत नं.१८० मध्ये घर बांधून दिले आहे का. इत्यादी मुद्दयांचा खुलासा व | १) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मार्गदर्शन, खुलासा मागता येत नाही. २) तथापि जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०९.२००९ रोजी माहिती दिली असल्याने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ग्रामसेवक संबंधित माहिती | दि.१२.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे. |
| ३ | २८५८/ पुणे | श्री.दिनकर साहेबराव सोनवणे मु.पो. राहू, ता.दौंड, जि.पुणे | सचिव, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित बारामती, रचना कॉम्प्लेक्स,३ रा मजला, ब्लॉक नं.७/८, सुभाष चौक, बारामती, जि.पुणे | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, ता. बारामती, जि.पुणे | जामीनदार श्री.सुभाष ढमढेरे व श्री.पंढरीनाथ गायकवाड यांच्या पगारामधून वसूल झालेल्या रकमेमधून वसूल केलेली रक्कम व व्याज मुद्दल इ.तपशील | १) मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. २) कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने दि.२५.०५.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. १८६३/पुणे, २३१३+२५८९/पुणे व २८५८/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४ -०७-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०३२/ पुणे | श्री.वसंत आपासाहेब चौगुले सर्व्हे नं.४९/२, फ्लॅट नं.४४, चंदननगर, नगर रोड, पुणे-१४ | प्रमुख लिपिक, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | निवासी उप जिल्हाधिकारी, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | चंदननगर (खराडी) नगररोड, पुणे-१४ येथील सध्या रस्ता रुंदीकरणात जाणारे हनुमान मंदिर हे अधिकृत आहे की अनधिकृत आहे? अधिकृत मंदिरायसाठी शासनाचे निकष काय आहेत ? | जन माहित अधिकरी / अपिलीय प्राधिकारी यांनी ३० दिवसांच्या आत माहिती देण्याचे अपीलकर्त्यासह एकत्रित चर्चेतील मान्यतेनुसार प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २०५६/ पुणे | श्री.हर्षकुमार पो.बम्ब ३६, कोहीनूर प्लॅनेट, स.नं.१३१६, औंध, पुणे-७ | नायब तहसीदार, तहसील कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे | तहसीदार, तहसील कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे | दुय्यम निबंधक हवेली यांच्या दि.०१.०४.०५ ते दि.३१.१२.०७ पर्यंत किती 'अ' पत्रके प्राप्त झाली त्यावर कार्यवाही करण्यात आलेल्या / कार्यवाही न करण्यात आलेल्या 'अ' पत्रकाची संख्या | सन २००५ ते सन २००८ या कालावधीतील माहिती ३० दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २२१६/ पुणे | श्री.संतोष बाळासाहेब थोरात फ्लॅट नं.९, जलविहार अपार्टमेंट, एकतानगरी, आनंदनगर, सिंहगड रोड, जि.पुणे | नायब तहसीदार, तहसील कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे | तहसीदार, तहसील कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे | मौजे उरुळीकांचन, ता. हवेली येथे शेतजमीन गट क्र.४३८ व ४३९ हा श्री.अनंत रामचंद्र थोरात यांच्या नावे होता. त्यांच्या मृत्यूनंतर करण्यात आलेल्या वारस नोंदीबाबत | जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी या १५ दिवसात अपीलकर्त्यास माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २९४५/ पुणे | श्री.संदीप प्रभाकर इथापे सातारा जिल्हा कारागृह, शहर पोलीस स्टेशन शेजारी, जि.सातारा | कार्यालयीन अधीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, प्रशिक्षण केंद्र नानवीज दौंड, ता.दौंड, जि.पुणे | प्राचार्य, राज्य राखीव पोलीस बल, प्रशिक्षण केंद्र नानवीज दौंड, ता.दौंड, जि.पुणे | जिल्हा कवायत निर्देशक (D.D.I.) प्रशिक्षण दरम्यान शिस्तभंगाच्या कार्यवाहीबाबत एकूण ६ मुद्यांची माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि.०१.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ४ (अपील क्र. २०३२, २०५६, २२१६, २९४५) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे. असे अनुक्रमांक १ ते ४ मध्ये नमूद केले आहे. त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा. त्यानुसार पूर्णता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०१ - ०७ - २००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४३६ / पुणे | श्री.शामसुंदर पांडुरंग कुलकर्णी ३८६/१, नारायण पेठ, पुणे-३० | अवर सचिव, महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | उप सचिव (आस्थापना), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | श्री रा.श्री.गायकवाड, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता व इतर २६ अधिकारी यांच्यावरील नीरा डाव्या कालव्याच्या कामातील अनियमितां बद्दलच्या दोषाबाबत | मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे. तसेच संबंधित अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचे कळविले आहे. मला माहिती देण्यास टाळाटाळ करून नीरा डाव्या कालव्याच्या नूतनीकरणाच्या कामात आलेल्या अनियमित-तांकडे डोळेझाक केली आहे, असे अपीलकर्त्यांने दि. २९.६.२००९ रोजीच्या पत्रात म्हटले आहे. |
| २ | १२३/ २००९ / पुणे | श्री. बबनराव राजाराम कोकरे रा.धुमाळ-वाडी, | कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, गोळीबार | अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे | सूचना देऊनही पाणी अर्ज नामंजूर का केले, आदेश का पाळले नाहीत त्या अनुषंगाने इतर २ ते ८ मुद्दयांची माहिती | अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १८.३.२००९ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात नमूद |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ता.बारामती, जि.पुणे | मैदान जवळ, पुणे | | | केलेली मुद्दा क्र.८ ची माहिती ८ दिवसांत अपीलकर्त्यास देऊन अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास अहवाल सादर करावा. |
| ३ | ६९८/ /पुणे | श्री. माणिक संभाजी भडंगे रा. शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे | मुख्याधिकारी नगर परिषद शिरूर, ता. शिरुर, जि. पुणे | उप आयुक्त, (सामान्य प्रशासन ), पुणे विभाग, पुणे | दलित वस्ती सुधारणा-योजनांतर्गत किती अनुदान प्राप्त झाले, त्याचा वापर कोठे केला, तत्संबंधी माहिती | १. अपीलकर्त्यास माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १७.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनाद्वारे कळविले आहे. २. माहिती प्राप्त झाली किंवा कसे, याबाबत दि.६.११.२००८ रोजीचे पत्राद्वारे अपीलकर्त्यास विचारणा करण्यात आली होती. तथापि अपीलकर्त्याने आयोगास काहीही अवगत केलेले नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ ( अपील क्र. १२३/२००९ /पुणे, ६९८/पुणे, व २४३६ / पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे

दि. २९ .७.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०७.२००९ रोजी पुणे आयोजित करण्यात आला होता त्यात समाविष्ट अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :–

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २५१६/ पुणे | श्री.शरद चंद्रकांत मुरडे तृप्ती,१०२७, सोळू रोड,ठाणे बँकेच्या मागे , आळंदी देवाची, ता.खेड. जि.पुणे | माहिती अधिकारी, आळंदी नगरपरिषद, जि.पुणे | मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, जि.पुणे | आळंदी नगरपरिषद रस्ते निधीचा जमाखर्च व बेकायदेशीर बांधकामाबाबत न्यायालयात झालेले निकाल | माहिती मिळालेली आहे, तक्रार नाही, असे अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना दि.१५.०७.२००९ रोजी लेखी दिल्याचे निवेदन / पत्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास सादर केले आहे. |
| २ | २५१७/ पुणे | श्री.महेंद्र उमेदमल संका ८५४/५, भवानीपेठ, कस्तुरी बिल्डिंग, पुणे -२ | प्राचार्य, झेडव्हीएम.युनानी मेडिकल कॉलेज, कॅम्प, पुणे-१ | सचिव, झेडव्हीएम, युनानी मेडिकल कॉलेज, कॅम्प, पुणे-१ | महाविद्यालयातील लिपिक श्री.आयुब याकुब शेख यांची सेवेतील रुजू दिनांक, तपशीलवार वेतन, मालमत्ता बँक ठेवी, गृहकर्ज इत्यादींची माहिती | अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाल्याचे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २५१८/ पुणे | श्री.महेंद्र उमेदमल रांका ८५१/५, भवानीपेठ, कस्तुरी बिल्डिंग, पुणे -२ | सहाय्यक अभियंता, भूमी आणि जिंदगी, पुणे म.न.पा. शिवाजीनगर, पुणे-५ | उप आयुक्त, भूमी आणि जिंदगी, पुणे म.न.पा. शिवाजीनगर, पुणे-५ | श्री.सावळराम भिमाशंकर घोरपडे यांचे अनधिकृत शेड संदर्भातील नोटीस नं.बीसीओ १४/३३१३, दि.०४.१०.२००४ वर केलेल्या कारवाईची माहिती | विषय बांधकाम नियंत्रण, हडपसर क्षेत्रिय कार्यालयाशी संबंधित असल्याने मूळ अर्ज व प्रथम अपील त्यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले. सबब हे अपील निकाली काढण्याबाबत 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये तिन्ही घटकांमध्ये एकमत झाले, असे तिघांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २८७३/ पुणे | श्री.अनिल भालचंद्र उंडे गुरुभक्ती, संभाजीनगर, भिगवण रोड, ता.बारामती, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे-६ | अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे-६ | भविष्य निर्वाह निधी मिसिंग क्रेडिट, सन २००८ मध्ये सी.आ.टी. व आर.टी. वरील कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे धोरण इ.माहिती | अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले आहे, असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २९७८/ पुणे | ॲड.विकास जोशी साई सदन, फ्लॅट नं.२९, | अव्वल कारकून, विशेष भूमी संपादन अधिकारी, क्र.२६ पुणे (कृष्णा खोरे) | विशेष भूमी संपादन अधिकारी, क्र.२६ पुणे | मौजे लोहगाव येथील स.नं.२४५ (पै) च्या भुसंपादनासाठी | मागितलेली कागदपत्रे अपीलकर्त्यास दाखवून |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चौथा मजला, पुण्याईनगर, धनकवडी, पुणे ४३ | पुणे, नवीन प्रशासकीय इमारत "अ" विंग, १ ला मजला, जुने विधान भवनासमोर, पुणे १ | (कृष्णा खोरे) पुणे, नवीन प्रशासकीय इमारत "अ" विंग, १ ला मजला, जुने विधान भवनासमोर, पुणे १ | आपली नेमणूक विशेष भूमी संपादन अधिकारी म्हणून कोणी व केव्हा केली त्याबाबतची कागदपत्रे व अनुषंगिक ४ मुद्दे | कागदपत्रे पुरविण्याबाबत क्र.माअ/अपील/१/०८,दि.०८.०५.२००८ अन्वये कळविले होते, असे अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. त्यानुसार अपीलकर्ता ॲड.जोशी यांनी संबंधितांकडे प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र.२५१६, २५१७, २५१८, २८७३ व २९७८/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.२५१८/पुणे मधील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी, मूळ माहितीचा अर्ज व प्रथम अपील, बांधकाम नियंत्रण हडपसर क्षेत्रिय कार्यालयाकडे पाठविल्याची / हस्तांतरीत केल्याची बाब आयोग, अपीलकर्ता, संबंधित हस्तांतर केलेल्या हडपसर कार्यालयातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निदर्शनास आणून संबंधितांना दि.१५.०७.२००९ चे 'विशेष अपील निर्गत कार्यमक्रमा'मध्ये उपस्थित राहणेबाबत अवगत करणे आवश्यक होते. त्यानुसार कार्यवाही न केलेबाबत संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९-०७-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २८४६/ पुणे | श्री.तेजांश ज्याती सी-५, १०२, हरमेश हेरिटेज, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे-६ | जन माहिती अधिकारी, सांख्यिकी व संगणक कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | अपिलीय प्राधिकारी, सांख्यिकी व संगणक कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | मे.ज्याती इन्फोसिसच्या कंत्राटाबाबत | आवश्यक ती माहिती १५ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २८४७/ पुणे | श्री.तेजांश ज्याती सी-५, १०२, हरमेश हेरिटेज, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे-६ | जन माहिती अधिकारी, सांख्यिकी व संगणक कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | अपिलीय प्राधिकारी, सांख्यिकी व संगणक कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | पुणे महानगर-पालिकेतील माहिती व तंत्रज्ञान संबंधित एकूण ०४ मुद्यांची माहिती | आवश्यक ती माहिती १५ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २८४८/ पुणे | श्री.तेजांश ज्याती सी-५, १०२, हरमेश हेरिटेज, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे-६ | जन माहिती अधिकारी, सांख्यिकी व संगणक कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | अपिलीय प्राधिकारी, सांख्यिकी व संगणक कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | ई.आर. पी. च्या कंत्राटाबाबत एकूण १५ मुद्यांची माहिती | आवश्यक ती माहिती १५ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २८६१/ पुणे | श्री.दिपक कुलकर्णी सरचिटणीस पुणे महानगर-पालिका, मजदूर संघ, १८५, शनिवार पेठ, पुणे-३० | उप आरोग्य प्रमुख पुणे महानगरपालिका, पुणे-५ | आरोग्य प्रमुख पुणे महानगरपालिका, पुणे-५ | मलेरिया इनव्हेस्टीगेटर वर्कर पदावर कार्यरत असणाऱ्या सेवकाविषयी एकूण ०७ मुद्यांची माहिती | माहिती देण्यास जजन माहिती अधिकारी तयार असल्याने अपील मागे घेत असल्याचे अपीलकर्त्याचे दि.१८.०३.२००९ रोजीचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मधील प्रपत्रात नमूद केले आहे |
| ५ | २९१६/ पुणे | श्री.सुधीर धोंडिबा लडकत ९११, भवनीपेठ, पुणे-२ | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय मावळ, ता.मावळ, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय मावळ, ता.मावळ, जि.पुणे | श्री.बबन बळवंत भेगडे, रा.तळेगाव दाभाडे यांचे नावावरील स्वस्त धान्य दुकानास २००५ ते २००८ या कालावधीतील रॉकेल, अन्नधान्य तेल पुरवठ्याबाबत माहिती, तसेच या कालावधीतील व्यवहाराची माहिती | अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | २९२०/ पुणे | श्री.अंकुश बाजीराव थिटे मु.पो.केंदूर, ता.शिरुर, जि.पुणे | नायब तहसीलदार, शिरुर तहसील कार्यालय, ता.शिरुर, जि.पुणे | तहसीलदार, शिरुर तहसील कार्यालय, ता.शिरुर, जि.पुणे | उप विभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, पुणे-१ आर.टी.एस. अपील नं.१३७/२००३ | अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | फेरनिर्णयाबाबत तहसीलदार, शिरुर याचा निर्णय न्यायनिवाडा प्रत मिळणेबाबत | |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ६ (अपील क्र. २८४६, २८४७, २८४८, २८६१, २९१६ व २९२०/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील अनुक्रमांक १ ते ६ मध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याचे नमूद केले आहे. त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०१-०७-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ.क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २९५५ + २९५५अ +२९१०+३०६३+ ३०७०/पुणे + ५३०/२००९/ पुणे | श्री. रूपचंद्र टिकाराम चौधरी २१२, ए-वॉर्ड, दामोदर कॉलनी, भांगरवाडी, लोणावळा, जि.पुणे | मुख्याध्यापक, डॉ. बी.एन.पुरंदरे बहुविध विद्यालय, लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे | अध्यक्ष, डॉ. बी.एन.पुरंदरे चॅरिटेबल ट्रस्ट, ३१-सी, डॉ. ए.एन.पुरंदरे मार्ग, मुंबई-७ |

**मूळ अर्जातील माहितीची मागणी**

**अपील क्र. २९५५/पुणे** - शाळेतील शिक्षकांच्या सर्व सभांचा संपूर्ण तपशील, शैक्षणिक वर्ष निहाय १ मार्च २००४ ते १५ जानेवारी २००९ या कालावधीतील माहिती

**अपील क्र. २९५५.अ /पुणे** - शाळेतील पालक संघाच्या कार्यकारणीच्या शैक्षणिक वर्षनिहाय याद्या, तसेच शिक्षक पालक संघाच्या सर्वसाधारण सभा, विशेष सभा इ. माहिती

**अपील क्र. २९१० /पुणे** - शाळेतील शाळा समिती, विद्या समिती यातील सदस्यांच्या वर्षनिहाय याद्या व सभांचा शैक्षणिक वर्षनिहाय तपशील

**अपील क्र. ३०६३ /पुणे** - अर्जदारा व्यतिरिक्त अन्य नागरिकांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठी अर्ज केला असल्यास त्याबाबतचा तपशील

**अपील क्र. ३०७० /पुणे** - माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदाराने केलेल्या माहिती अर्जांच्या संदर्भात, तसेच अभिलेख दाखविण्यासाठी केलेल्या विनंती अर्जांच्या संदर्भात शिक्षणाधिकारी माध्यमिक व संस्थेचे अध्यक्ष यांचेबरोबर केलेला पत्रव्यवहार

**अपील क्र. ५३०/२००९/पुणे** - राज्य माहिती आयोग यांचेकडील अपील क्र.१२७२, १२७३ / २००७ दि. २.७.२००८ या आदेशानुसार १७ जुलै २००८ रोजी संपन्न झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'शी संबंधित असलेला भूतपूर्व व विद्यमान राज्य *जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय प्राधिकारी यांचे संबंधातील संपूर्ण तपशील छायांकित प्रतीच्या स्वरूपाने

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रूपचंद टिकाराम चौधरी यांनी उक्त अपील अर्जासमवेत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती दिल्याचे /कार्यवाही केल्याचे दिसून येते.

प्राप्त माहितीने समाधान न झाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता आयोगाकडे वारंवार अपिले दाखल करीत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

यापूर्वी आयोगाने अपीलकर्त्याच्या अपील क्र.१२७२, १२७३, १२६/०९ व १२७/०९ मध्ये निर्णय दिलेले आहेत. अपीलकर्ता एकाच विषयाची वारंवार माहिती मागत असल्याने अपीलकर्त्यास समज देण्यात येऊन अपिले फेटाळण्यात आली आहेत. अपीलकर्त्यांची पूर्वीची व सध्याची अपिले व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता मागितलेली माहिती ढोबळ व विस्तृत असून एकाच संस्थेकडे एकाच विषयाबाबत व माहिती दिल्यानंतरही मिळालेल्या माहितीतून माहिती मिळविण्याच्या स्वरूपात सातत्याने विविध अर्ज करीत असल्याचे दिसते.

प्राप्त झालेल्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान होत नसेल, माहिती दिशाभूल करणारी वाटत असेल, तर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकन करता येईल. तसे न करता वारंवार अर्ज व अपिले करणे हा सर्व संबंधित यत्रंणेचा वेळ, श्रम वाया घालविणे आहे. याबाबत अपीलकर्त्यास सक्त समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ६ अपिले ( अपील क्र. २९५५/ पुणे, २९५५-अ/पुणे, २९१०/पुणे, ३०६३/पुणे, ३०७० /पुणे, व ५३०/२००९ / पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपीलकर्त्याने मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी अभिलेख अवलोकनास उपलब्ध करून द्यावेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.अनंत देऊ गावडे
स.नं.३६/२, विद्यानगर लेन नं.६
वर्ल्ड वॉटर टँक, पुणे ४११ ०१५

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा

**उत्तरवादी**

१) तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय,
शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

२) नगर उप अभियंता, विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

३) विशेष कार्याधिकारी ,
पुणे महानगरपालिका, भूमी मापन कार्यालय,
जकात बिल्डिंग, पुणे ४११ ००५

४) विकास अभियंता,
पाणीपुरवठा व मल निःस्सारण,
सावरकर भवन, पुणे महानगरपालिका,
पुणे ४११ ००५

५) प्रशासक,
पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती,
मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७

**जन माहिती अधिकारी तथा**

१) नायब तहसीलदार
हवेली तहसील कार्यालय,
शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

२) सहायक अभियंता,
विकास योजना व बांधकाम नियंत्रण,
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

३) सहायक अभियंता,
पुणे महानगरपालिका, भूमी मापन कार्यालय,
क्षेत्रिय कार्यालय इमारत, ढेरे उद्योग भवन,
टिळक रोड, पुणे ४११ ००२

४) सहायक अभियंता,
पाणी पुरवठा व मलनि:सारण प्रकल्प,
ढेरे उद्योग भवन, टिळक रस्ता क्षेत्रीय कार्यालय इमारत,
टिळक रोड, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

५) माहिती अधिकारी,
पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती,
मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९८५ + १८६/२००९/पुणे +१८७/२००९/पुणे + १८८/२००९/पुणे + ३५२/२००९/पुणे |
| २ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -<br>१) **अपील क्रमांक २९८५** - मौजे धानोरी ता.हवेली येथील स.नं.४७ व ९० मधील खाणीचा खड्डा बुजविणेबाबतची माहिती<br>२) **अपील क्रमांक १८६/२००९/पुणे** - कार्यालयातील पत्र जा.क्र.नऊज/१०८६, दि.१२.११.२००१ चे पत्राचे अनुषंगिक प्रकरणातील कागदपत्रे, नकाशे टिपण्या इ. मिळणेबाबत<br>३) **अपील क्रमांक १८७/२००९/पुणे** - कार्यालयातील जा.क्र.एलएक्यु/ओ/१९६२, दि.२१.०३.२००७ या पत्राचे अनुषंगिक प्रकरणातील सुरुवातीपासून ते आजपर्यंतच्या सर्व कागदपत्रे, नकाशे वगैरेच्या प्रती मिळणेबाबत<br>४) **अपील क्रमांक १८८/२००९/पुणे** - जा.क्र.मप्र ७७,दि.२९.०४.२००३ च्या पत्राचे अनुषंगिक प्रकरणातील सर्व कागदपत्रे, नकाशे इत्यादींच्या प्रती मिळणेबाबत<br>५) **अपील क्रमांक ३५२/२००९** - मौजे मुंजेरी (बिबवेवाडी) स.नं.५५९/अ-२ ही जमीन भूसंपादन केली असल्यास त्याची माहिती कागदपत्रांसहित मिळणेबाबत | |

## विवेचन

आयोगाकडील दि.१५.०७.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले आहे. सबब आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले (क्रमांक २९८५, १८६/२००९/पुणे, १८७/२००९/पुणे, १८८/२००९/पुणे व ३५२/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) उपरोक्तनुसार अपीलकर्ता श्री.गावडे हे वेळोवेळी विविध शासकीय विभागांकडे माहिती अधिकाराचा वापर करुन अर्जांद्वारे शासकीय यंत्रणेवर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असल्याची तोंडी तक्रार आयोगाकडे करण्यात आली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा योग्य उपयोग होणे आवश्यक आहे. याबाबत दक्षता घेण्याची समज अपीलकर्ता श्री.अनंत देऊ गावडे यांना देण्यात येत आहे.

पुणे
दि. : ३० -०७-२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०७.२००९ रोजी पुणे आयोजित करण्यात आला होता.त्यात समाविष्ट अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :–

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३०९५/ पुणे | श्री.आनंद शंकरराव गायकवाड फ्लॅट नं.३०५, वास्तु रजनी अपार्टमेंट, मानाजी बाग, बोपोडी, पुणे–३ | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, खडकी, पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, खडकी, पुणे | मीटर क्रमांक ९०१००९६१०२ (जुना क्रमांक ९०००२९८०६) व ग्राहक क्रमांक १७००१६६९६२११ या मीटरची वील बिलाची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ८ | ८३/ २००९/ पुणे | सौ.बीना वसंतराव आनंदे संगीत विद्यालयाजवळ, सोपान नगर, मु.पो.सासवड ता.पुरंदर, जि.पुणे | शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, भोर उपविभाग, जि.पुणे | उपविभागीय अधिकारी, भोर उपविभाग, जि.पुणे | सासवड येथील सर्व्हे नं.५ मधील श्री.ज्ञानोबा गणपती वढणे यांनी क्षेत्र विकताना कुळकायद्यानुसार कलेक्टर / प्रांत यांची परवानगी | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | घेतली असेल तर त्याची नक्कल, मिळाली नसेल तर सविस्तर तपशील उपलब्ध व्हावा. | |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते २ (अपील क्र. ३०९५, ८३/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८-०७-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सय्यद जॉनीमियाँ मिस्त्री — अपीलकर्ता
उपाध्यक्ष, शाह अ लतीफ कादरीया कब्रस्तान,
सेवा समिती, अक्कलकोट रोड, सोलापूर
३२१/३९, मुस्लीम पाच्छा पेठ, सोलापूर

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय अधिकारी
झोन क्र. २, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००८ |

३. उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (विशेष),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. अनिल स. विपत

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय अधिकारी झोन क्र.२,
सोलापूर महानगरपालिका, तर्फे मुंडेवाडी अ.रशीद म. उस्मान

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

महानगरपालिकेतील गाळा क्र.२५६ मधील पी ब्लॉक समोरील अनेक कबरी असलेल्या आरक्षित जागेभोवती संरक्षक भिंत बांधण्यासाठी नगररचना खात्याने दिलेल्या लेखी ऑर्डरची प्रत, तसेच गाळा क्र. २५६ च्या जागेचा लोकेशन प्लॅन व सनदेच्या खऱ्या नकला, गाळा क्र.२५६ मध्ये लागून असलेल्या ओपन स्पेसमध्ये अनधिकृतपणे पत्र्याचे शेड मारले होते त्याचे संपूर्ण नाव व पत्ता, व त्यांचेवर करण्यात आलेल्या कारवाई संदर्भात माहिती, गाळा क्र. २५६ च्या शेजारी असलेल्या ओपन स्पेसच्या जागेत

जगनमात मंदिराचे बांधकामास परवान्याबाबत माहिती मागितली होती त्या पत्राची प्रत, दि. ३१.१०.२००५ रोजी अब्दुल लतीफ कादरी कब्रस्तान समितीच्या वतीने लेखी निवेदन दिले होते त्यामध्ये सिटी इंजिनिअर यांचेसमवेत झालेल्या चर्चेत त्यांनी कबरीभोवती तारेचे कंपाऊड व झाडे लावून देण्याचे ठरले होते व तसे आदेश त्यांनी दिले होते, असे असतानाही सदर कामाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी का झालेली नाही, याबाबतचा खुलासा

## विवेचन

सोलापूर महानगरपालिका गाळा क्र.२५६ मधील पी ब्लॉक समोरील असलेल्या कबरींच्या संरक्षणासाठी तारेचे कुंपण करणे व झाडे लावणे या संदर्भातील मागणी अपीलकर्ता श्री. सय्यद जॉनीमियॉं मिस्त्री, उपाध्यक्ष, शाह अ लतीफ कादरीया कब्रस्तान, सेवा समिती, सोलापूर यांनी अधीक्षक, भूमि व मालमत्ता, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे (दि. १६.३.२००६) व विभागीय अधिकारी क्र. ४, सोलापूर महानगरपालिका (दि. १.४.२००६) यांच्याकडे केली होती. संबंधित विभागाकडे हे अर्ज पाठवून श्री. मिस्त्री यांना माहिती देण्यात आली, परंतु विभागीय अधिकारी क्र. २ श्री. निळकंठ मठपती यांनी अर्ज समक्ष न स्वीकारता टपालाने पाठविण्यास सांगितले. पाठविलेल्या अर्जावर समाधानकारक माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका श्री. अनिल विपत यांनी अपिलाचा निर्णय दिला नाही. श्री. मठपती यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशाप्रमाणे कबरीभोवती कुंपण करण्याचे व झाडे लावण्याचे काम पूर्ण करणे आवश्यक होते, ते त्यांनी केले नाही, म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशा मागणीसाठी श्री. मिस्त्री यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमात उभय बाजूंचे एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

श्री. मिस्त्री यांनी मागणी केलेली माहिती कागदपत्रांच्या स्वरूपात नसून कार्यवाहीची आहे, त्याबाबतची माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली होती. महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद नसल्यामुळे काम करता आले नव्हते. आता पुरेशी तरतूद मंजूर झाली असल्याने नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे, असे जन माहिती अधिकारी तथा प्र. विभागीय अधिकारी, सोलापूर

महानगरपालिका श्री. एस.के.रस्तुरगी यांनी दि. १८.११.२००८ च्या व विभागीय अधिकारी, विभाग क्र.२, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. निळकंठ शी. मठपती यांनी दि. १४.११.२००७ च्या लेखी निवेदनाद्वारे आयोगाला अवगत केले आहे.

श्री. मिस्त्री यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. निधी नसल्यामुळे कुंपण व झाडे लावण्याचे काम करता आले नाही, आता त्याची पूर्तता करण्यात येत आहे, असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी अ.रशीद म. उस्मान व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत ती येत नाही. तरीही, 'कबरीच्या कडेने काटेरी कुंपण, झाडे लावण्यात यावीत आणि हे काम विभाग अधिकारी क्र.२, सोलापूर महानगरपालिका यांनी येत्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे, अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० नुसार दंडात्मक कारवाई करून आयोगाकडे आपल्याविरूध्द अहवाल सादर करण्यात येईल,' असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी दिला. प्रशासकीय कार्यवाही न केल्याबद्दल दंड करण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नाही. तसेच दंडाची कारवाई करण्याचा अधिकार अपिलीय प्राधिकारी यांना नाही, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. अनिल विपत यांना देण्यात येत आहे. मात्र प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने त्यांनी ही कृती केली, याची नोंदही घेण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.७.२००९